History Research Journal



"एखादी व्यक्ती गरीब असून ती भंग्याच्या घरी जन्मली आहे म्हणून आयुष्यभर मैला साफ करण्याचं काम करेल आणि जगातील कोणत्याही प्रकारचं विकासाचं काम तिला मिळवता येणार नाही, ही गोष्ट साफ चुकीची आहे. अशाप्रकारे आपल्या पूर्वजांनी त्यांच्याशी हे अन्याय वर्तन केलं आहे. त्यांना नीच म्हणून फटकारलं आहे आणि खालच्या दर्जाची कामं करायला भाग पाडलं आहे.

त्यांनी माणसाच्या मनातील माणुसकी नष्ट केली. आत्मविश्वास आणि स्वावलंबन या भावना संपुष्टात आणल्या. अत्यंत दडपणूक आणि अन्याय करण्यात आला. आज या सगळ्या गोष्टींचं प्रायश्चित घेण्याची वेळ आली आहे. ... संघटित होऊन, आपल्या पायावर उभे राहून संपूर्ण समाजाला आव्हान द्या. त्यावेळी तुमच्या अधिकारापासून कोणीही तुम्हाला वंचित ठेवण्याची हिंमत करणार नाही. तुम्ही दुसऱ्यांच्या हातातील बाहुले बनू नका. दुसऱ्यांच्या तोंडाकडे पाहत बसू नका. नोकरशाहीच्या तावडीत सापडू नका. कारण ही भांडवलशाही नोकरशाहीच तुमच्या गुलामीचं आणि गरिबीचं खरं कारण आहे. त्यांच्या डावपेचांपासून स्वतःचा बचाव करा. तुम्हीच स्वतःचे खरे तारणहार आहात... एकजूट व्हा. तुमचं कसलंही नुकसान होणार नाही. फक्त तुमच्या या गुलामीच्या श्रृंखला कापल्या जातील."

- शहीद भगतसिंग

(जून 1928 मध्ये 'किरती' या पत्रिकेत छापून आलेल्या शहीद भगतसिंग यांच्या लेखाचा सारांश)

UGC Care Listed Journal

इतिहास संशोधन पत्रिका ○ अंक पंचविसावा

UGC Care Listed Journal
ISSN-0976-5425

# मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद


# History Research Journal

Issue - XXV

# इतिहास संशोधन पत्रिका

अंक पंचविसावा





कार्यकारी संपादक
डॉ. सोमनाथ रोडे

UGC Care Listed Journal

History Research Journal

इतिहास संशोधन पत्रिका

Issue. - XXV April

अंक - पंचविसावा 2021

ISSN : 0976 – 5425

प्रकाशक :

प्रा. विजय पांडे

सचिव, मराठवाडा इतिहास परिषद

श्री संत सावता माळी महाविद्यालय, फुलंब्री

जि. औरंगाबाद भ्रमणध्वनी – ९४२२७ २३२७७

मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद

संपर्क :

प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे

कार्यकारी संपादक

४- शारदानगर, अंबाजोगाई रोड, लातूर

पीन : ४१३ ५३१ फोन : ०२३८२- २२८०९०.

भ्रमणध्वनी : ९४२१४ ८३६११, ७५१७९ ८५६९०

मुखपृष्ठ छायाचित्रे – डॉ.अनंत शिंदे

मूल्य : रु. २००/-

पंचवार्षिक वर्गणी रु.१,०००/-

दशवार्षिक वर्गणी रु.२,०००/-

प्रकाशन दि. २४ व २५ एप्रिल २०२१

अक्षर जुळवणी व मुद्रक :

विद्याभारती प्रकाशन

गुजराती शाळेजवळ, मेन रोड,

लातूर- ४१३ ५१२

The publication of the MSS/ Journals/Proceedings- financially supported by the Indian Council of Historical Research and the responsibility for the facts, stated, options expressed and conclusion researched is entirely that of the author/ authors of the articles and the Indian Council of Historical Research accepts no responsibility for them.

# • भूमिका •

मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबादचे चाळिसावे राष्ट्रीय पातळीवरील अधिवेशन कै. बापूसाहेब एकंबेकर सेवाभावी संस्थेचे कै. बापूसाहेब पाटील एकंबेकर महाविद्यालय, उदगीर जि.लातूर येथे दिनांक २४ व २५ एप्रिल २०२१ रोजी ऑन लाईन पद्धतीने संपन्न होत आहे. इतिहास परिषद ही राज्यभरातील इतिहास प्राध्यापक, अभ्यासक, संशोधक आणि विद्यार्थ्यांचे कृतिशील व्यासपीठ म्हणून इ. स.१९८० पासून कार्यरत आहे. इतिहास विषयात नवीन साधनांद्वारा मांडणी, लिखाण, संशोधन उपलब्ध करून देण्याचे काम परिषदेच्या व्यासपीठावरून झाले आहे. मान्यवर संशोधक, अभ्यासक आणि इतिहासकारांनी अधिवेशनाच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्याचे कार्य सातत्याने केले आहे.

संशोधनपर शोधनिबंध परिषद्देने नियमितपणे प्रकाशित केले आहेत. इ. स.१९८५ ला 'निवडक शोधनिबंध' या शीर्षकाने अंकाचे प्रकाशन झाले. मात्र इ. स. १९९७ पासून परिषदेने 'इतिहास संशोधन पत्रिका'- 'History Research Journal' या नावाने शोधनिबंध प्रकाशित केले आहेत. अध्यक्षीय भाषण, सत्राध्यक्षांची भाषणेही संशोधन पत्रिकेतून प्रकाशित करण्यात येत आहेत. १४ जून २०१९ पासून इतिहास संशोधन पत्रिकेचा समावेश UGC Care List मध्ये झालेला आहे. ही अत्यंत आनंदाची बाब आहे. परिषदेच्या व्यासपीठावरून उत्कृष्ट शोधनिबंध सादर व्हावेत म्हणून परिषदेच्या वतीने तिन्ही विभागांतून उत्कृष्ट शोधनिबंधाला रोख रु. १५०० व प्रमाणपत्राचे पारितोषिक ३७ व्या अधिवेशनापासून देण्यास सुरुवात केली आहे. इतिहास संशोधन पत्रिका प्रकाशित करण्यामागची भूमिका स्थानिक संशोधन प्रकाशित व्हावे, नवीन संशोधकांना प्रकाशनासाठी व्यासपीठ मिळावे आणि संशोधनासंदर्भात मार्गदर्शन आणि प्रेरणा मिळाव्यात अशी आहे. परिषदेच्या व्यासपीठावरून आतापर्यंत सुमारे १५८० शोधनिबंध सादर झाले. त्यांपैकी परिषदेने ७३० शोधनिबंध प्रकाशित केले आहेत. प्रकाशनाची जबाबदारी संपादक मंडळ, इतिहास संशोधन पत्रिकेचे स्थायी सभासद, वर्गणीदार, वाचक, परिषदेचे आजीव व वार्षिक सदस्य आणि सातत्याने मौलिक आर्थिक साहाय्यता देणारी 'भारतीय इतिहास अनुसंधान परिषद, नवी दिल्ली' (आयसीएचआर) यांनी उचललेली आहे. त्याबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार. चोविसाव्या अंकाचे वाचक स्वागत करतील ही अपेक्षा. मराठवाडा इतिहास परिषद कार्यकारिणी संपादक मंडळाने घेतलेल्या परिश्रमाबद्दल त्यांचे अभिनंदन करते. मराठवाडा इतिहास परिषदेने साडेतीन दशकांचा काळ यशस्वी रीत्या पूर्ण केला आहे. आतापर्यंत परिषदेने २४ 'इतिहास संशोधन पत्रिका' इतिहासाच्या अभ्यासकांसमोर सादर केल्या याचे मनोमन समाधान वाटते. आपणा सर्वांच्या सदिच्छेच्या बळावर परिषदेची भावी वाटचाल गतिमान होईल, असा आम्हास विश्वास वाटतो.

प्रा. विजय पांडे
सचिव

डॉ. जाकेर पठाण
अध्यक्ष

**सर्व सदस्य**

**मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद**

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | लेखक | पृष्ठांक | शीर्षक |
|---|---|---|---|
| | **प्राचीन विभाग** | | |
| १. | डॉ.अरविंद सोनटक्के | १९ | केदारेश्वर मंदिरावरील मोहिनी की काली : एक शोध |
| २. | डॉ. विजय सरडे | २३ | मत्स्येंद्रशिष्य चौरंगीनाथ |
| ३. | Mr. Ravi Dinkar Khillare | २७ | The Importance of Bhon Stupa an Overlook Buddhist Monument of Maharashtra in Ashokan Era |
| ४. | डॉ. विनोद बाबूराव बोरसे | ३२ | प्राचीनातून नामशेषाकडे – विशेष संदर्भ, पितळखोरा लेणी क्र. ०४ समोरील शिल्प |
| ५. | प्रा. संजय पाईकराव | ३७ | पैठण येथील बौद्ध परंपरा : एक शोध |
| ६. | डॉ. नारायण सूर्यवंशी | ४० | शिरूर अनंतपाळ नगरातील चालुक्यकालीन शिवालये व शिल्पवैभव |
| ७. | डॉ. नितीन बावळे, कु. मयुरी पुरजळकर | ४८ | प्राचीन आंतरराष्ट्रीय व्यापार केंद्र, तेर |
| ८. | डॉ. गणेश काशीनाथ होनराव | ५२ | ऐतिहासिक साधनांमधून आलेला कापालिक संप्रदाय |
| ९. | डॉ. कारभारी एस. वाघमारे | ५६ | ''सम्राट अशोक का धम्म : एक अध्ययन'' |
| १०. | श्री. समुद्रगुप्त पाटील | ६५ | गुजरातमधील पटान पटोला अद्‌भुत साड्यांचे माहात्म्यः |
| | **मध्ययुगीन विभाग** | | |
| १. | डॉ. शिवाजी वाघमोडे | ६९ | अध्यक्षीय भाषण |
| २. | डॉ. कामाजी डक | ७५ | छत्रपती संभाजी महाराज यांचा औरंगाबाद शहराशी आलेला संबंध |
| ३. | डॉ. ओमशिवा लिगाडे | ८३ | शिवकालीन न्यायदानातील फौजदारी गुन्ह्याचे संदर्भ |
| ४. | डॉ. राजेंद्र गायकवाड | ८९ | हिंदुस्थानच्या राजकीय इतिहासाला कलाटणी देणारे पानिपत |
| ५. | श्री. दिनेश रामनाथ कचकुरे, डॉ. कृष्णा मालकर | ९४ | छत्रपती शिवाजी महाराजांची साक्षरता |

६

# शिरूर अनंतपाळ नगरातील चालुक्यकालीन शिवालये व शिल्पवैभव

✲

डॉ. नारायण सूर्यवंशी
शिवनेरी महाविद्यालय, शिरूर अनंतपाळ, जि. लातूर

राष्ट्रकुटांच्या नंतर दक्षिणेत चालुक्य वंश प्रबळ बनला. त्यांनी कल्याण येथे राजधानी स्थापन केली. राजधानीच्या नावावरूनच या चालुक्यांना 'कल्याणीचे चालुक्य' म्हणून ओळखले जाऊ लागले. बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातूर या परिसरावर कल्याणच्या चालुक्यांचे वर्चस्व प्रस्थापित झाले. यांच्या काळातच अंबाजोगाई, लातूर, धाराशिव, धर्मापुरी इत्यादी केंद्रे उदयास आली.[१] चालुक्यांचे अनेक मंत्री, अधिकारी आणि मांडलिक या परिसरात वास्तव्य करून होते. मंत्री, अधिकारी व मांडलिक यांनी दिलेल्या दानाच्या नोंदी असलेले कित्येक शिलालेख या परिसरात प्राप्त झाले आहेत. शिरूर अनंतपाळ तालुक्यातील गणेशवाडी, शिरूर अनंतपाळ, लातूर, अणदूर, रामलिंग मुदगड, डाळिंब, निल्लेगाव, विटकळ, माडज, दिंडेगाव, झरी इत्यादी गावी हे शिलालेख आहेत.[२] कल्याणीचा चालुक्य राजा विक्रमादित्याच्या नागपूर येथील प्राप्त शिलालेखात 'लत्तालूर' असा उल्लेख आलेला आहे.[३] कल्याणीचा चालुक्य राजा विक्रमादित्य सहावा याचा सेनापती भीमनाथ याचा शिरूर अनंतपाळ तालुक्यातील गणेशवाडी येथे संस्कृत शिलालेख आहे. याचा काळ शके १०२१ असा आहे. या संस्कृत शिलालेखात परिसरातील ग्रामनामांचा उल्लेख आलेला आहे.[४] पहिला आणि दुसरा सोमेश्वर व सहावा विक्रमादित्य या राजांनी लातूर जिल्ह्यावर अनेक वर्षे वर्चस्व गाजविले. चालुक्यनरेश विक्रमादित्याचा मुलगा तिसरा सोमेश्वर याचा कोरीव लेख लातूर येथे प्राप्त झाला असून त्यामध्ये लातूरचा 'लत्तालूर' असा नामनिर्देश आणि पापविनाश मंदिर बांधल्याचा उल्लेख सापडतो.[५]

वरील विवेचनावरून शिरूर अनंतपाळ व परिसरावर कल्याणीच्या चालुक्य वंशाची सत्ता होती असे दिसते. त्याच काळात या परिसरात अनेक शिवालये व तडाग निर्माण केली. या परिसरातील शिवालयातील शिल्पांवरून तत्कालीन कला, स्थापत्य व संस्कृती तसेच तत्कालीन धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचा इतिहास मांडता येतो.

याच परिसरात शिरूर अनंतपाळ हे नगर अस्तित्वात असून नगरात अनेक शिवालये आहेत. हे ऐतिहासिक शिरूर अनंतपाळ नगर घरणी नदीच्या उजव्या तीरावर



वसलेले असून आज ते तालुक्याचे मुख्यालय आहे. या नगरात कल्याणीच्या चालुक्य नरेशांच्या काळात हेमाडपंथी धाटणीची तीन शिव मंदिरे उभारली आहेत. ते श्री अनंतपाळ शिवालय, श्री नारायण मंदिर व श्री मल्लिकार्जून शिवालय या नावांनी पंचक्रोशीत परिचित आहेत. या तीन शिवालयांपैकी श्री अनंतपाळ हे ग्रामदैवत मानले जाते.

श्री अनंतपाळ शिवालयात नंदी मंडपाच्या समोरच्या बाजूस दीपमालेच्या लगत एक शिलालेख होता. त्या शिलालेखातील मजकुरावरून ही शिवालये इ. स. १२ व्या शतकातील आहेत. या शिलालेखात ग्रामनामाचा 'शिरूरी' असा उल्लेख आलेला आहे तसेच या प्राचीन नगरात असलेल्या मंदिरातील देवांचा उल्लेख 'अनंतेश्वरा' व 'नारायणदेवा' असा आलेला आहे.

कल्याणीचा चालुक्यनरेश विक्रमादित्य सहावा यांचा मंत्री अनंतपाळ दंडनायक याला हे गाव चालुक्यनरेशाकडून मिळाले असावे. याच अनंतपाळ दंडनायकाने या नगरात ही शिवालये उभारली. मंदिरांची नावे त्याच्या निर्मात्यावरून निश्चित करण्याची प्रथा प्राचीन काळी रूढ होती. याच न्यायाने शिरूर नगरातील मुख्य शिवालयाला 'अनंतपाळ' हे नामाभिधान प्राप्त झाले असे दिसते. पुढे शिरूर या ग्रामनामास 'अनंतपाळ' हे उपपद लागले व त्यातूनच कालौघात अनंतपाळाचे शिरूर व पुढे जाऊन शिरूर अनंतपाळ हे आजचे नगरनाम अस्तित्वात आले. शिरूर अनंतपाळ येथे संत भावंडीबाई होऊन गेल्या. त्यांनी 'गुरुदास गाथा' हा अभंग ग्रंथ दोन खंडांत प्रकाशित केला. त्यांनी आपल्या गुरुदास गाथेतील अभंगात अनंतपाळचा उल्लेख खालीलप्रमाणे केलेला आहे.–

१. शिवपुरी ग्राम असे महाथोर । शिवालय फार असे तेथे ॥१॥
शिवपुरी लागी शिरूर म्हणती । भक्तांचिया कीर्तीवरूनीया ॥२॥
देवाचे हे नाव अनंत ते पाळ । भक्तांचा सांभाळ करीत असे ॥३॥[६]

२. अनंत हे पाळ अनादि दैवत । नाम हे प्रख्यात शोभा तसे ॥१॥

वरील अभंगात शिरूर अनंपाळमध्ये अनेक शिवालये असल्याचा उल्लेख आलेला आहे. श्री अनंतपाळ, श्री नारायण व श्री मल्लिकार्जुन ही तीन शिवालये हेमाडपंथी धाटणीची असून, छोटे–मोठे इतर शिवालय शिरूर अनंतपाळ नगरात आहेत. या शिवालयाच्या बांधणीसाठी काळा पाषाणाचा वापर केलेला आहे. हेमाद्री पंडित मंदिरांच्या विशिष्ट प्रकाराच्या धाटणीसाठी प्रसिद्ध आहेत. दगडावर दगड ठेवून किंवा दगडांना खाचा घेऊन वरील मंदिरांचे बांधकाम केलेले आहे. म्हणून या मंदिरांचा अभ्यास करणारे वास्तुतज्ज्ञ डॉ. हरिहर ठोसर व डॉ. व्यंकटेश या शिवालयास हेमाडपंथी संबोधतात.

**आख्याईका** : शिरूर अनंतपाळ या ऐतिहासिक नगरातील जनमानसामध्ये श्री अनंतपाळ शिवालय, श्री नारायण मंदिर व श्री मल्लिकार्जुन शिवालय ही तीन शिवालये राक्षसांनी

एका रात्रीत बांधली आहेत, अशी आख्यायिका आहे. यावरून आपणांस असा अर्थबोध होतो की, या शिवालयांची उभारणी करण्यासाठी आलेले वास्तुशिल्पकार दक्षिणेकडील असावेत. त्यांनी दगड काढून, दगड घडवून या शिवालयाची अल्प कालावधीत उभारणी केली असावी. साधारणपणे लंका अथवा दक्षिणेकडील भागाला 'राकिसम्होर' म्हणण्याचा प्रघात आहे. हे वास्तुशिल्पकार शरीराने आडदंड व रंगाने काळेकुट्ट असावेत. दक्षिणेकडे राहणारे लोक म्हणजे राक्षस! म्हणूनच या वास्तुशिल्पकारांनी उभारलेल्या या शिवालयाबद्दल राक्षसांनी उभारलेले शिवालये असा पूर्वापार उल्लेख होत असावा, असे अनुमान काढता येते.

### १. श्री अनंतपाळ शिवालय व आतील शिल्प :

श्री अनंतपाळ शिवालयाचा विस्तार उत्तर–दक्षिण ५० फूट व पूर्व–पश्चिम ६० फूट एवढा आहे. त्याचबरोबर मंदिराचे प्रवेशद्वार पूर्वेकडे असून मंदिराच्या चहूबाजुंनी वाऱ्या होत्या. आज तेथे शाळा भरते. हे मंदिर बिल्वदलीय असून हरिहाराचा संगम घडवून आणण्याचा प्रयत्न त्या काळात केलेला दिसतो.

**मुख्य गर्भगृह :**

मुख्य गर्भगृहाचे द्वार २.५ रुंद व ५ फूट उंच असून याच द्वारावर लालाटी गणेश आहे. मुख्य गर्भगृह ८ × ८ फूट चौकोनी स्वरूपाचे आहे. मुख्य गाभाऱ्यात ३ × ४ फूट आकाराचे शिवपिंड आहे. या गाभाऱ्याच्या भिंती सपाट असून या भिंतीवर कोणतेच नक्षीकाम नाही.

**अंतराळ :**

गर्भगृह व सभामंडप यांच्यामधील दालनास अंतराळ असे म्हणतात.[७] हे अंतराळ ७ × ८ फूट आहे. या अंतराळात उत्तरेकडील बाजूस देवकोष्टक आहे तर दक्षिणेकडील बाजूस नऊ ग्रहांची शिल्प कोरलेले आहेत. मंदिराचा मंडप चौकोनी आकाराचा आहे. छतावर कीर्तिमुख तसेच त्रिकोणी शिळांच्या मध्यावर चौकोनी शिळावर एक विकसित कमळ कोरलेले आहे.

**सभामंडप :**

अनंतपाळ शिवालयाचा मुख्य सभामंडप २५ × २५ फूट या आकाराचा आहे. हा मंडप प्रामुख्याने मध्यभागी चार घडीव पाषाणाचे खांब व दोन अंतराळाच्या व सभामंडपाच्या मधोमध व दोन खांब मंदिराच्या मुख्य द्वाराच्या आतल्या बाजूस आहे. याची उंची ९.५ फूट एवढी आहे. या मंदिराला एकूण सोळा गाभारे आहेत. हे मंदिर त्रिदलीय स्वरूपाचे आहे.



**गणेश शिल्प :**

सभामंडपात उजव्या बाजूस देव कोष्टके असून त्या एका देव कोष्टकात १.५ × २.५ फूट आकाराचे गणेश शिल्प आहे.

**शेषशायी विष्णू शिल्प :**

सभामंडपात डाव्या बाजूस दोन कोष्टके स्थित असून त्याच्या खालच्या बाजूस शेषशायी विष्णूचे अखंड पाषाणात कोरलेले शिल्प आहे. त्यात विष्णूने शंख , चक्र, गदा ही आयुधे धारण केलेली असून यात लक्ष्मी विष्णूचे पाय चेपत असून विष्णूच्या नाभीतून ब्रह्मकमळ उगवलेले आहे. या शिल्पात विष्णूच्या अंगावर वेळोवेळी आभूषणे दर्शविलेली आहेत. हे शिल्प ४ फूट लांब व २.५ फूट रुंद या आकाराचे आहे.

**उत्तर व दक्षिण दिशांची दोन गर्भगृहे किंवा उपमंदिरे :**

हे शिवालय त्रिदलीय स्वरूपाचे असून उत्तरेकडील बाजूस असलेल्या उपमंदिरातील गर्भगृहात शिव–पार्वतीचे शिल्प आहे. या गर्भगृहाचे द्वार २.५ फूट रुंद व ५ फूट उंच आहे. हे गर्भगृह ६ × ७ फूट आकाराचे असून त्याच्या पुढे ३ × ५ फूट एवढ्या आकाराचे अंतराळ आहे. या गर्भगृहात २.५ फूट उंच व २ फूट रूंद या आकाराचे शिव–पार्वतीचे शिल्प आहे. शिवाच्या उजव्या हातात त्रिशूळ व डाव्या हाताने पार्वतीला तोलून धरलेले आहे. पार्वती शिवाच्या डाव्या मांडीवर बसलेली असून तिचा डावा पाय खाली सोडलेला आहे. पार्वतीचा उजवा हात शिवाच्या गळ्याभोवती आहे. या शिल्पावर विविध प्रकारचे अलंकार दर्शविलेले आहेत. हे शिव–पार्वतीचे शिल्प सुंदर, सुबक व कलाकृतीचा उत्तम नमुना आहे.

या गाभाऱ्याला पाषाणयुक्त चौकट असून या चौकटीवर द्वारपाल उभे असलेले पाषाणात कोरलेले आहेत.

**श्री लक्ष्मी नारायण उपमंदिर :**

मुख्य सभामंडपाच्या दक्षिण बाजूस मंदिरातच श्री लक्ष्मी नारायणाचे मंदिर स्थित आहे. हे मंदिर ६ × ७ फूट या आकाराचे असून उंची ११ फूट आहे. या गाभाऱ्यात श्री लक्ष्मी नारायणाचे शिल्प गरुडावर आरूढ आहे. हे शिल्प २ × ३ या आकाराचे आहे. नारायणाच्या डाव्या मांडीवर लक्ष्मीदेवी आसनस्थ झालेल्या असून, त्यांचा डावा पाय खाली सोडलेला आहे. विष्णूच्या उजव्या हातात चक्र धारण केलेले आहे तर डाव्या हाताने लक्ष्मीला पेलून धरलेले आहे तसेच एका डाव्या हातात गदा धारण केलेली आहे. लक्ष्मीने आपला उजवा हात विष्णूच्या मानेभोवती टाकलेला आहे. या मंदिराची चौकट ५ फूट उंच व २.५ फूट रुंद आहे. या चौकटीवर गरूड ललाट आहे. चौकट पाषाणयुक्त आहे. चौकटीवर खालच्या बाजूस द्वारपाल दर्शविलेले आहेत. त्याच्या खाली दोन्ही

बाजूस हत्तीचे शिल्प कोरलेले आहेत.

**शिवालयाच्या बाहेरील भिंतीवरील शिल्पे :**

शिवालयाच्या द्वाराबाहेर उजव्या बाजूस भिंतीवर १९ शिल्पांची एक रांग असून त्याच्या खाली रांगेत लहान आकाराची २६ शिल्पे एका ओळीत आहेत. या शिल्पात बासरीवादक श्रीकृष्ण, मृदंगवादक पुरुष, आळस देणारी आलशा, मृदंग वादिका, नृतिका अशा वेगवेगळ्या अवस्थांतील शिल्पे कोरलेली आहेत. या शिल्पांचा आकार १ फूट उंच व ४ इंच रुंद असा आहे. ही शिल्पे ठळक असून त्यावर वेगवेगळे भाव दर्शविलेले आहेत. तसेच त्यावर असलेले दागिने स्पष्ट दिसत आहेत. त्याच्या खालील बाजूस अखंड प्रस्तरात ४ × ४ इंच या आकाराचे एक एक फूट अंतराने २६ शिल्पे आहेत. या शिल्पात गणपती आणि वेगवेगळ्या देवता बसलेल्या स्थितीत दर्शविलेल्या आहेत.

शिवालयाच्या मुख्यद्वाराच्या डाव्या बाजूस असलेल्या भिंतीवर १ फूट उंच व ४ इंच रुंद या आकाराचे १८ स्त्री-पुरुष शिल्प वरील रांगेत आहेत तर त्याच्या खालील रांगेत ४ × ४ इंच आकाराचे २२ लहान शिल्पे आहेत. ही शिल्पे स्त्री-पुरुष वेगवेगळ्या अवस्थांतील शिल्प असून त्यात प्रामुख्याने गणपती, गरूड अशा वेगवेगळ्या देवी-देवता व वाहनांचे शिल्प कोरलेले आहेत.

**नंदी मंडप :**

शिवालयाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर १० फूट अंतरावर शिवालयाकडे तोंड करून असलेले बसलेल्या अवस्थेतील नंदीचे शिल्प आहे. हा नंदी मंडप १० × १० फूट आकाराचा पाषाण खांबावर उभा आहे. नंदी मंडपाच्या उत्तर बाजूस लगत दीपमाळ आहे.

**२. श्री नारायण शिवालय व आतील शिल्प :**

या शिवालयाची पूर्व-पश्चिम ५० फूट तर दक्षिण-उत्तर ३० फूट एवढी आहे. शिवालयाच्या मुख्य गाभाऱ्यात २ × ३ फूट आकाराची शिवपिंड आहे. एक फूट उंचीचे व ४ इंच गोलाईचे शिवलिंग आहे. या गाभाऱ्यांची रुंदी ८ × ८ या चौकोनी आकाराची आहे तर उंची १२ फूट आहे. या मुख्य गाभाऱ्याचे द्वार पाषाणाचे असून हे द्वार ३ × ६ फूट आकाराचे आहे. द्वारावर गरूड आहे तर खालील बाजूस दक्षिण व उत्तर बाजूस दोन द्वारपाल व एक एक स्त्री शिल्प असून त्या शिल्पाचा आकार २ × २ फूट एवढा आहे.

**अंतराळ :**

या मुख्य गर्भगृहाच्या बाहेरील बाजूस ७ × ८ आकाराचे अंतराळ आहे.



**सभामंडप :**

या शिवालयाचा मुख्य सभा मंडप ४ पाषाणयुक्त खांबांवर स्थित असून हा सभामंडप २० × २० फूट या आकाराचा आहे. हे मंदिर बिल्वदलीय असून या सभामंडपातच उत्तर बाजूस शिव-पार्वतीचे मंदिर आहे.

**शिव-पार्वती शिल्प :**

सभामंडपात उत्तर बाजूस असलेल्या मंदिरात शिव-पार्वतीचे शिल्प असून या शिल्पाची उंची ४ × ३ फूट एवढी आहे. शिवाच्या उजव्या हातात त्रिशूळ आहे तर डाव्या हातात सर्प धारण केलेला आहे तर दुसऱ्या डाव्या हाताने पार्वतीला पेलून धरलेले आहे. हे शिव-पार्वती नंदीवर विराजमान असून नंदीचे एक फूट लांबीचे शिल्प आहे. शिवाच्या डाव्या मांडीवर पार्वती विराजमान आहे तर डावा पाय खाली सोडलेला आहे. शिवाचा उजवा पाय नंदीवर आहे. नंदी बसलेल्या स्थितीत दर्शविलेला आहे.

या शिल्पावरच डाव्या बाजूस ५ × १० इंचाचे श्रीगणेशाचे शिल्प आहे तर उजव्या बाजूस मोरावर आरूढ असलेल्या शिव-पार्वती पुत्र कार्तिकेयाचे शिल्प आहे. याच शिल्पावर वरील बाजूस लहान लहान आकारात वेगवेगळी शिल्पे कोरलेली आहेत. शिव-पार्वतीच्या डोक्यावर मुकुट दर्शविलेला आहे.

**गाभारा :**

या शिव-पार्वती मंदिराचा गाभारा ५ × ५ फूट या आकाराचा आहे. या शिव-पार्वती मंदिराला पाषाणयुक्त द्वार असून २.५ × ५ फूट या आकाराचे आहे. या द्वारावर खालील बाजूस दोन द्वारपाल व स्त्रीचे शिल्प स्थित आहे.

**लक्ष्मी नारायण शिल्प :**

नारायण शिवालयाच्या आतील दक्षिणेकडील बाजूस एक गर्भगृह असून त्याचा आकार ५ × ५ फूट एवढा आहे. या गर्भगृहातील श्री लक्ष्मी नारायणाचे शिल्प बाहेरील बाजूस ठेवण्यात आलेले आहे. गरूडावर आरूढ असलेली श्री लक्ष्मी-नारायणाचे शिल्प सुस्थितीत असून शिव-पार्वतीच्या शिल्पाच्या आकाराचे आहे. नारायणाच्या डाव्या मांडीवर लक्ष्मीदेवी आरूढ झालेली असून त्यांचा उजवा हात विष्णूच्या गळ्याभोवती आहे. विष्णूचा उजवा पाय गरूडावर आहे. विष्णूच्या एका हातात चक्र असून डाव्या हाताने लक्ष्मीला पेलून धरलेले आहे. एका डाव्या हातात गदा आहे. याच शिल्पावर दोन्ही बाजूस वारा घालत असलेल्या दोन दासी दर्शविलेल्या आहेत. हे शिल्प ३ × ४ फूट या आकाराचे आहे. लक्ष्मी-नारायणाच्या डोक्यावर मुकुट आहे.

शिवालयाच्या बाहेरील बाजूस मुख्य प्रवेशद्वाराच्या दक्षिणेस ३८ छोटे शिल्प आहेत. त्याचा आकार १ फूट × ४ इंच इतका आहे तर उत्तर बाजूस २९ शिल्पे आहेत. या शिल्परांगाच्या खालील बाजूस २ × ४ इंच आकाराचे एक एक फूट अंतराने बहुसंख्य

शिल्प अखंड प्रस्तरात कोरलेले आहेत.

**३. मल्लिकार्जुन शिवालय :**

अनंतपाळ शिवालयाच्या पश्चिमेला मल्लिकार्जुन शिवालय आहे. हे शिवालय इतर दोन शिवालयांपेक्षा लहान आकाराचे असून बाहेरील बाजूने ते हेमाडपंथी स्वरूपाचे वाटत नाही.

**गर्भगृह :**

या मंदिरातील गर्भगृह ६ × ८ फूट आकाराचे असून शिवलिंग २ × ३ फूट आकाराचे आहे. या मुख्य गाभाऱ्याचे द्वार २.५ × ५ फूट आकाराचे आहे. गर्भगृहाच्या भिंती सपाट आहेत.

**अंतराळ :**

मुख्य गर्भगृहाच्या पुढे ६ × ६ फूट आकाराचे अंतराळ असून अंतराळाची उंची १० फूट एवढी आहे. दोन्ही बाजूनी देवकोष्टके आहेत.

**सभामंडप :**

सभामंडप २० × १५ फुटांचा असून तो चार खांबांवर उभा आहे. या खांबाची उंची ८ फूट असून सभामंडपाच्या छताची उंची १२ फूट आहे. या मंदिरात कलाकुसर नाही.

**मंदिरासंबंधी प्रचलित आख्यायिका :**

अनंतपाळ शिवालय, नारायण शिवालय, मल्लिकार्जुन शिवालय एका रात्रीत राक्षसांनी बांधली व पहाट होताच मल्लिकार्जुन शिवालयाचे बांधकाम अर्धवट ठेवून ते निघून गेले, अशी आख्यायिका येथील ग्रामस्थ सांगतात.

वरीलप्रमाणे शिरूर अनंतपाळ या ऐतिहासिक नगरात तीन हेमांडपंथी शिवालये कल्याण चालुक्याच्या कालखंडात उभारली गेली ती आजतागायत सुस्थितीत आहेत.

**निष्कर्ष :**

१. या परिसरावर कल्याणच्या चालुक्य वंशाची सत्ता होती.
२. चालुक्यनरेशांनी या परिसरातील नगरे आपल्या मंत्र्यांना दिली.
३. चालुक्याचे अनेक मंत्री, अधिकारी आणि मांडलिक या परिसरात वास्तव्य करून होते.
४. मंत्री, अधिकारी व मांडलिकांनी दिलेल्या दानाच्या नोंदी अनेक शिलालेखांतून आढळून येतात.
५. कल्याणाचा चालुक्य राजा विक्रमादित्य सहावा याचा मंत्री अनंतपाळ दंडनायक याला हे शिरूर अनंतपाळ नगर राजाकडून मिळाले होते असे दिसते.



६. शिरूर अनंतपाळ या नगरात अनंतपाळ दंडनायकानेच ही शिवालय उभारल्याचे स्पष्ट होते.
७. शिरूर अनंतपाळ नगरातील ग्रामदैवताला अनंतपाळ हे नामाविधान अनंतपाळ दंडनायक यांच्या नावावरूनच मिळालेले दिसते.
८. श्री अनंतपाळ व श्री नारायण शिवालये बिल्वदलीय आहेत.
९. तत्कालीन वास्तुशिल्पकारांनी हरी हरेश्वर संगम घडवून शैव आणि वैष्णवांना एकत्र करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.
१०. शेकडो वर्षे होऊनही ही शिवालये अभेद्य आहेत. यात तत्कालीन वास्तुकला सर्वोत्कृष्ट असल्याचे दिसते.
११. या शिवालयातील शिल्प घडविणारे शिल्पकार आठ पुराणांतील कथा पाषाणावर चितारताना दिसतात.
१२. ही शिवालये धार्मिक, सांस्कृतिक जडण–घडणीची केंद्रे आहेत असे म्हणावे लागेल.
१३. शेकडो वर्षांपूर्वीची वास्तुकला व शिल्पकला तसेच तत्कालीन आभूषणे व धार्मिक कल्पना आजही जिवंत आहेत.
१४. या शिवालयामुळे पुरातन संस्कृती जिवंत राहिली असे म्हणता येईल.
१५. शिल्पामधून वेगवेगळ्या देवी–देवतांचे दर्शन घडते.
१६. शिवालयामुळे शिरूर अनंतपाळ नगराचे प्राचीनत्व सिद्ध होते.

**संदर्भ**

१. काळे भगवान, संपा., १९८६, मराठवाडा काल व आज (पूर्वार्ध) संकेत प्रकाशन, जालना, पृष्ठ क्र. २०.
२. जोशी सु.ग., संपा. १९९९, डॉ. देवीसिंह चौहान गौरव ग्रंथ, मराठवाडा संशोधन मंडळ, औरंगाबाद, पृष्ठ क्र.१४८.
३. देव शां. भा., १९६८, महाराष्ट्र एक पुरातत्त्वीय समालोचन, मराठी ग्रंथ संग्रहालय, मुंबई, पृष्ठ –२०४.
४. कोलते वि.भि., १९८७ महाराष्ट्रातील काही ताम्रपट व शिलालेख, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई. पृ.१५९.
५. तर्कतीर्थ जोशी लक्ष्मण शास्त्री, संपा. मराठी विश्वकोश, लातूर जिल्हा, खंड १५, महाराष्ट्र राज्य, मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, पृष्ठ – २९७.
६. पाटील श्रीसंगशेट्टी अप्पा, १९५१, गुरुदास गाथा, भाग–२, प्रकाशक गुरुभक्त भावंडीबाई, श्री देशिकेंद्र प्रेस, लातूर पृष्ठ–९०.
७. कुलकर्णी र.पु., १९९५, भारतीय वास्तुशास्त्र, इंदोर, पृष्ठ–१७१.

ooo

**'मनुष्याच्या अभेद्य प्रामाणिकपणाची कसोटी त्याच्यावर जेव्हा वार होत असतात तेव्हाच लागते.'**

**–कॉ. कुमार शिराळकर**